# प्रेस नोट

**१०वी अखिल भारतीय पोलीस चॅम्पीयनशीप स्पर्धा - २०२१ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलाची उल्लेखनीय कामगिरी**

## (४ सुवर्ण, ५ रौप्य व १ कांस्य पदक)

दि. ०९ ते १३ नोव्हेंबर २०२१ या कालावधीमध्ये ग्रेटर नोएडा, उत्तर प्रदेश येथे १०वी अखिल भारतीय पोलीस आर्चरी स्पर्धा २०२१ संपन्न झाली. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र पोलीस पुरूष व महिला आर्चरी संघाने सहभाग नोंदवून खालील प्रमाणे पदकांची लयलुट केली आहे.











| अ.क्र. | खेळाडूचे नाव | नेमणुक | प्रकार | कामगिरी |
|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/२२६९,मोनाली जाधव | बुलढाणा | कंपाऊंड ५० मी - I | रौप्य पदक |
| | | | कंपाऊंड ५० मी - II | सुवर्ण पदक |
| | | | कंपाऊंड ओव्हर ऑल | सुवर्ण पदक |
| | | | कंपाऊंड - ऑलंपिक राऊंड | सुवर्ण पदक |
| २ | मपोशि/११८८, भागुबाई बल्लाळ | वाशिम | कंपाऊंड ५० मी - I | सुवर्ण पदक |
| | | | कंपाऊंड ओव्हर ऑल | रौप्य पदक |
| ३ | पोउनि/अनुराधा पाटील | बृहन्मुंबई | इंडियन राऊंड - ५० मी | कांस्य पदक |
| | | | इंडियन - ऑलंपिक राऊंड | रौप्य पदक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | पोशि/ आकाश उदुगुडे | मुंबई शहर | कंपाऊंड - मिश्र संघ | रौप्य पदक |
| ५ | मपोशि/२२६९,मोनाली जाधव | बुलढाणा | | |
| ६ | मपोशि/२२६९,मोनाली जाधव | बुलढाणा | कंपाऊंड सांघीक संघ | रौप्य पदक |
| ७ | मपोशि/ ११८८,भागुबाई बल्लाळ | वाशिम | | |
| ८ | मपोशि/ १३६४,रेखा लांडकर | वाशिम | | |
| ९ | मपोशि/४३२, सिमा दुबे | वर्धा | | |
| १० | पोह/१४२, सुरेश शिंदे | रा.रा.पो.ब.ग.०८ गोरगाव, मुंबई. | प्रशिक्षक/समन्वयक - खेळाडूंकडून सातत्याने सराव करुन घेऊन पदक प्राप्त कामगिरी करुन घेतली. | --- |

महाराष्ट्र पोलीस दलास पदकांची आशा असलेली महाराष्ट्र पोलीस दलाची आर्चरी क्रीडा प्रकारामधील **गोल्डन गर्ल** या नावाने ओळखली जाणारी मपोशि/मोनाली जाधव यांनी नेहमीप्रमाणे चमकदार कामगिरी करीत वैयक्तीक व सांघीक या प्रकारामध्ये ३ सुवर्ण व ३ रौप्य पदक असे एकुण ६ पदके प्राप्त केली. तसेच मुळची आर्चरी क्रीडा प्रकाराची राष्ट्रीय खेळाडू असलेले व नुकतेच पोलीस उप निरीक्षक पदाचे प्रशिक्षण पुर्ण करुन पोलीस दलामध्ये हजर झालेले खेळाडू पोउनि/अनुराधा पाटील यांनी सराव करुन वैयक्तीक १ रौप्य व १ कांस्य पदक प्राप्त केले. त्याचबरोबर कंपाऊंड मिश्र प्रकारामध्ये रौप्य पदक आणि महिला कंपाऊंड सांघीक प्रकारामध्ये रौप्य पदक महाराष्ट्र पोलीस संघाने प्राप्त केले. **महाराष्ट्र पोलीस महिला संघाने अखिल भारतीय पोलीस स्पर्धेमध्ये सर्वसाधारण उप विजेतेपद प्राप्त केले.**

कोरोना - १९ या महामारीच्या मुळे सरावामध्ये खंड पडून सुध्दा आणि कोरोनो नियमांचे काटेकोर पणे पालन करुन आपल्या सरावामध्ये सातत्य राखून सदर खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. सरावामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये खंड पडून सुध्दा खेळाडूंनी सरावामध्ये सातत्य राखून पुर्नआगमण केले आहे. प्रशिक्षक / समन्वयक पोह/१४२, सुरेश शिंदे - रा.रा.पो.बल.गट.८ गोरेगाव, मुंबई यांनी खेळाडूंकडून उत्कृष्ठ प्रकारे सराव घेवून वेळोवळी त्यांना प्रोत्साहन केले. सदर आर्चरी खेळाडू प्रशिक्षणार्थी साठी आज प्रेरणादायी ठरत आहे.

महाराष्ट्र पोलीस आर्चरी संघास श्री. संजय पांडे, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्री. अनुप कुमार सिंग, अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन) म. रा. मुंबई, सहाय्यक क्रीडा अधिकारी श्री. जुनेद खान, संघ व्यवस्थापक/ रापोनि/भरतसिंग ठाकुर - पो.प्र.केंद्र, अकोला आणि प्रशिक्षक/समन्वयक - सुरेश शिंदे, यांनी वेळोवेळी त्यांना प्रोत्साहन देवून मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्यांच्यामधील उणिवा दूर करुन खेळातील कार्यक्षमता व मानसिक संतुलन उच्चतम राहिल असे वातावरण तयार केले. अशा केलेल्या प्रयत्नामुळे व मार्गदर्शनामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस दलामधील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकत आहेत.

Junaid Khan 23/11/2021.

**(जुनेद खान)**
सहाय्यक क्रीडा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य पोलीस, मुंबई.